मौजे गहुंजे, पुणे येथील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन आंतरराष्ट्रीय स्टेडीयम येथे दि. ०९ फेब्रुवारी, २०१६ रोजी होणाऱ्या "भारत विरुध्द श्रीलंका" या आंतरराष्ट्रीय T-२० क्रिकेट सामन्याकरीता इंटरनेटद्वारे तिकीट आरक्षण करुन संगणकाद्वारे तसेच प्रत्यक्ष तिकीट केंद्रावर तिकीट विक्री करण्यास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः ईएनटी-२०१६/प्र.क्र.३/टी-१
पहिला मजला, मंत्रालय,
मुंबई-४०० ०३२.
तारीख: २२ जानेवारी, २०१६.

<u>**वाचा**</u> **:-** १) मानद सचिव, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन, पुणे यांची दि.०७.०१.२०१६ व १४.०१.२०१६ ची पत्रे.
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.ईएनटी-१०९९/प्र.क्र.२१५/टी-१, दिनांक २१.९.२०००
३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.ईएनटी-१००७/प्र.क्र.२९/भाग-१/टी-१, दि.१४.६.२०१०.

<u>प्रस्तावना :-</u>

संदर्भ क्र. २ वरील शासन निर्णयान्वये शासनाने आंतरराष्ट्रीय पाच दिवसांचे कसोटी क्रिकेट सामने सोडून इतर सर्व प्रकारच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यांवर महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ च्या **कलम ३(१)(ब)** मधील तरतुदींनुसार करमणूक शुल्क आकारण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुषंगाने, **संदर्भ क्र. १** वरील पत्रान्वये महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन, पुणे यांनी केलेल्या विनंतीचा विचार करून मौजे गहुंजे, जि. पुणे येथील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या आंतरराष्ट्रीय स्टेडीयम मध्ये **दि.०९ फेब्रुवारी, २०१६ रोजी** महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन, पुणे यांचेव्दारे आयोजित करण्यात येणाऱ्या **"भारत विरुध्द श्रीलंका"** या आंतरराष्ट्रीय T-२० क्रिकेट सामन्याकरीता इंटरनेटद्वारे तिकीट आरक्षण करुन संगणकाद्वारे तसेच प्रत्यक्ष तिकीट केंद्रावर संगणकीकृत तिकीट विक्री तसेच थेट तिकीट विक्री करण्याकरिता महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम तसेच संदर्भाधीन दि.२१.९.२००० व दि. १४.६.२०१० च्या शासन निर्णयांमधील तरतुदींनुसार महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन, पुणे यांना मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

मौजे गहुंजे, पुणे येथील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या आंतरराष्ट्रीय स्टेडीयम मध्ये **दि.०९ फेब्रुवारी, २०१६ रोजी** होणाऱ्या **"भारत विरुध्द श्रीलंका"** या आंतरराष्ट्रीय T-२० क्रिकेट सामन्याकरीता महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन, पुणे यांना इंटरनेटद्वारे तिकीट आरक्षण करण्यास व

तिकीट विक्री केंद्रावर संगणकीकृत तिकीट तसेच थेट तिकीट विक्रीस उपलब्ध करुन देण्यास महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ मधील तरतुदींनुसार तसेच संदर्भाधीन दि.२१.९.२००० व दि. १४.६.२०१० च्या शासन निर्णयांमधील तरतुदींनुसार **खाली नमूद करण्यात आलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्याच्या अटी व शर्तींच्या अधीन राहून याद्वारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.**

I. <u>आंतरराष्ट्रीय T-२० क्रिकेट सामन्याकरीता तिकीट विक्री. :-</u>

i. दि. ०९ फेब्रुवारी, २०१६ रोजी होणाऱ्या **"भारत विरुध्द श्रीलंका"** या आंतरराष्ट्रीय T-२० क्रिकेट सामन्यांच्या तिकीट विक्री केंद्रामध्ये प्रत्यक्ष तिकीट उपलब्ध करुन देण्याकरिता प्रत्येक रोलमध्ये २५० तिकीटे अथवा त्या पटीत तिकीटे असावीत. प्रत्येक तिकीटावर शासनाने विहित केल्यानुसार मुद्रित करावयाच्या मजकूराशिवाय प्रायोजकांचे नाव व लोगो यांची छपाई करण्याची मुभा राहील.

ii. तिकीट विक्री करण्याकरिता व्यवस्था असलेल्या प्रत्येक विक्री केंद्राकरिता स्वतंत्र संकेतांक असावा.

iii. सदर तिकीटांवर **"ए" टू "झेड"** या अक्षरांनी सुरु होणारी मालिका असावी.

iv. तिकीट विक्री करणाऱ्या संस्थेने **प्रत्येक तिकीटाची छपाई तीन भागात** करावी. तिकीटाच्या डावीकडून पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या भागावर अनुक्रमे ऑडीटकरिता असलेल्या तिकीटाच्या भागावर "A", दरवाजावर असलेल्या व्यक्तीकडे ठेवण्यात येणाऱ्या तिकीटाच्या भागावर "D", व प्रेक्षकांकडे असणाऱ्या तिकीटाच्या भागावर "P" अशी अद्याक्षरे छापण्यात यावीत.

v. प्रत्येक तिकीटावर सिरीयल नंबर, रोल नंबर, तिकीटधारकाने प्रवेश करावयाची प्रवेशद्वार, प्रवेश शुल्क, ऑनलाईन तिकीटाकरिता आकारण्यात आलेला सेवा आकार / कन्व्हेनियन्स चार्ज तसेच एकूण प्रवेश शुल्कावर देय होणा-या करमणूक शुल्काचा स्पष्टपणे उल्लेख करण्यात यावा. तिकीटांचे ऑनलाईन आरक्षण करणाऱ्या व्यक्तीस संकेतांक देऊन त्या व्यक्तीने सदर संकेतांक तसेच ओळखपत्र तिकीट विक्री केंद्रांवर उपलब्ध करुन दिल्यास त्याला आरक्षित केलेले तिकीट उपलब्ध करुन देण्यात यावे.

vi. प्रत्येक तिकीट धारकास तिकीटावर नमूद प्रवेशद्वारातूनच स्टेडियम मध्ये प्रवेश देणे आवश्यक असून तिकीटधारकाने आरक्षित केलेल्या जागेवर जाण्याकरिता त्याला एका यंत्राच्या समोरुन जाणे आवश्यक असल्याने याकरिता तिकीटावर बार कोड देण्यात यावा. तिकीटाच्या तीन भागांपैकी प्रथम भाग स्टेडीयम मध्ये आत जातांना सुरक्षा रक्षकास संबंधित व्यक्तीने उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

vii. महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमातील तरतुदींनुसार अभिकर्त्याने संगणकीकृत तिकीट विक्री करण्याकरिता जिल्हाधिकारी, पुणे यांचे कार्यालयाकडून तिकीटाचा नमूना प्रमाणित करुन घ्यावा. तसेच तिकीटाकरिता वापरण्यात येणारा रोल करमणूक शुल्क अधिकाऱ्यांमार्फत दिनांक व स्वाक्षरीसह मुद्रांकित करुन प्रमाणित करुन घ्यावा.

viii. तिकीट विक्रीकरिता तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून तिकीट विक्री केंद्रास मान्यता देण्याकरिता संबंधित सक्षम पोलीस प्राधिकाऱ्यांची तसेच जिल्हाधिकारी, पुणे यांची आवश्यक ती सर्व विहीत मान्यता घेण्यात यावी.

II. **आंतरराष्ट्रीय T-२० क्रिकेट सामन्याकरीता सामन्यावर अनुज्ञेय होणारे करमणूक शुल्क.:-**

i. मौजे गहुंजे, जि. पुणे येथील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर दि. ०९ फेब्रुवारी, २०१६ रोजी होणाऱ्या "**भारत विरुध्द श्रीलंका**" या आंतरराष्ट्रीय T-२० क्रिकेट सामन्याकरिता एकूण ४२,४३६ इतक्या आसन क्षमतेपैकी ३७,२६४ इतक्याच आसनांकरीता तिकीट विक्री करून त्याव्दारे प्राप्त होणा-या रकमेवर महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमाच्या **कलम ३(१)(ब)** मधील तक्त्यात **"इतर क्षेत्राकरिता"** विहित करण्यात आलेल्या **१० % इतक्या दराने करमणूक शुल्क लागू होईल.**

ii. सदर आंतरराष्ट्रीय T-२० क्रिकेट सामन्याच्या ऑनलाईन तिकीट विक्रीकरिता प्रती तिकिट कमाल रू. १०/- पर्यंत सेवाआकार / कन्व्हेनियन्स चार्ज आकारल्यास त्यावर करमणूक शुल्क लागू होणार नाही. या निश्चित सेवाआकार / कन्वहेनियन्स चार्जच्या रकमेव्यतिरिक्त अधिकची रक्कम सेवाआकार / कन्वहेनियन्स चार्ज म्हणून आकारल्यास अशा आकाराचा स्वतंत्र उल्लेख तिकीटावर करण्यात यावा.

iii. तिकीटावरील प्रवेशशुल्क तसेच कमाल रु. १०/- एवढा निश्चित सेवाआकार / कन्वहेनियन्स चार्ज वगळून उर्वरित सेवाआकाराची / कन्वहेनियन्स चार्जची रक्कम अशा एकूण रकमेवर महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम मधील कलम ३(१)ब मधील तक्त्यात **"इतर क्षेत्राकरिता"** विहित दराने करमणूक शुल्क आकारण्यात यावा. ऑनलाईन तिकीटविक्रीबाबतचे स्वतंत्र विवरण सदर सामना संपल्यानंतर पुढील दोन कार्यालयीन दिवसांत जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयास उपलब्ध करुन देणे व अनुज्ञेय करमणूक शुल्काचा भरणा करणे अभिकर्ता यांना अनिवार्य राहील.

iv. सदर सामन्यापूर्वी किमान एक दिवस अगोदर स्टेडियमच्या एकूण आसन क्षमतेच्या प्रमाणात देय करमणूक शुल्काएवढी अनामत रक्कम अभिकर्त्याने जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे जमा करणे बंधनकारक राहील.

v. प्रस्तुत प्रकरणी जमा होणारा करमणूक शुल्क जिल्हाधिकारी, पुणे यांनी "००४५, विक्रेय वस्तू व सेवा यावरील इतर कर व शुल्क, उपशिर्ष १०१" या लेखाशिर्षाखाली जमा करावा. अभिकर्त्याने भरणा केलेल्या अनामत रकमेतून शासनास देय होणारे करमणूक शुल्क समायोजित करुन उर्वरित रकमेचा परतावा, लेखाहिशोब सादरीकरणानंतर ४ आठवडयांमध्ये, संबंधितांना करण्यात यावा.

vi. **दि. ०९ फेब्रुवारी, २०१६** रोजी होणाऱ्या "**भारत विरुध्द श्रीलंका**" या आंतरराष्ट्रीय T-२० क्रिकेट सामन्याकरिता तिकीट विक्री न झालेल्या तिकीटांचे उर्वरित रोल जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कार्यालयात त्याच दिवशी जमा करण्यात यावेत. तसेच,

प्रत्येक सामन्याचे लेखा हिशोब अभिकर्त्याकडून जिल्हाधिकारी, पुणे यांना सदर सामना संपल्यानंतर पाच कामकाजाच्या दिवसांत सादर करण्यात यावेत.

vii. सर्व तिकीटांच्या स्थळप्रती (Counterfoils) सदर सामना संपल्यानंतर २ महिन्यांच्या कालावधीकरिता जतन कराव्यात. तद्नंतर सदर स्थळप्रतींचे नाशन संबंधित करमणूक शुल्क निरिक्षक यांनी स्वतःच्या उपस्थितीत करुन घेऊन त्यासंदर्भात नोंदवहीत दिनांकित स्वाक्षरी करावी.

viii. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या आंतरराष्ट्रीय स्टेडियममधील कॉर्पोरेट बॉक्समधील एकूण २०४ इतक्या आसनांकरिता महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन, पुणे यांनी जिल्हाधिकारी, पुणे यांना भाडेकराराच्या नोंदणीकृत प्रती उपलब्ध करुन द्याव्यात. जिल्हाधिकारी, पुणे यांनी सदर भाडेकराराची शहानिशा संबंधित मुद्रांक शाखेमार्फत करुन करार योग्यरीत्या नोंदणीकृत असल्यास प्रत्येक १ वर्षाच्या कराराकरीता आकारण्यात येणाऱ्या रकमेवर विहित दराने करमणूक शुल्क आकारावे. सदर करमणूक शुल्काचा भरणा महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन, पुणे यांनी केल्यानंतर पुढील १ वर्षामध्ये सदर ठिकाणी होणाऱ्या एकदिवशीय आंतरराष्ट्रीय, आयपीएल व तत्सम क्रिकेट सामन्यांकरिता या कॉर्पोरेट बॉक्समधील आसनांसाठी जिल्हाधिकारी, पुणे यांनी स्वतंत्रपणे करमणूक शुल्क आकारु नये. सदर करार ग्राह्य धरण्यास काही अडचण असल्यास जिल्हाधिकारी, पुणे यांनी या कॉर्पोरेट बॉक्सच्या निकटवर्ती आसनांकरीता आकारण्यात येणारे प्रवेश शुल्क विचारात घेऊन त्यानुसार, कॉर्पोरेट बॉक्समधील आसनाचे प्रवेश शुल्क निश्चित करावे व त्यावर अनुज्ञेय होणारे करमणूक शुल्क परिगणित करुन त्या शुल्काचा भरणा करुन घ्यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२२१३४८२१००१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sharad Madhavrao Doke

Digitally signed by Sharad Madhavrao Doke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=SECTION OFFICER, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=49a6844e93d7a1180c3226081e6f456ddf8d7b1bc67bc4bd78fa78029ab559db, serialNumber=b6d84b8aafc59276d709cc7218691343d053ce00524eb05a7fb23fbfe5a5b2c6, cn=Sharad Madhavrao Doke
Date: 2016.01.22 18:11:07 +05'30'

(शरद डोके)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत, आवश्यक त्या तात्काळ कार्यवाहीकरिता अग्रेषित,
अपर जिल्हाधिकारी, पुणे.

प्रत माहितीसाठी,

१) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुबई.
२) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुबई.
३) प्रधान सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुबई.
४) विभागीय आयुक्त, पुणे.
५) जिल्हाधिकारी, पुणे.
६) पोलीस आयुक्त, पुणे/ पोलीस अधिक्षक, पुणे (ग्रामिण), पुणे.
७) प्रधान महालेखापाल (लेखापरिक्षा, लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
८) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
९) मानद सचिव, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन, पुणे.
१०) निवड नस्ती (टी-१).